# जेष्ठ संस्कृततज्ज्ञ डॉ. माधवी कोल्हटकर यांचा ‘लोकमान्य टिळक संस्कृत’ पुरस्काराने गौरव




टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या श्री बालमुकुंद लोहिया संस्कृत आणि भारतीयविद्या अध्ययन केंद्रातर्फे दिला जाणारा यंदाचा ‘लोकमान्य टिळक संस्कृत’ पुरस्कार ज्येष्ठ संस्कृततज्ज्ञ प्रा. डॉ. माधवी कोल्हटकर यांना विद्यापीठाचे कुलपती व ‘केसरी’चे विश्वस्त-संपादक डॉ. दीपक टिळक यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले. टिमविच्या कुलगुरू डॉ. गीताली टिळक, श्री बालमुकुंद लोहिया संस्कृत विभागाच्या प्रमुख डॉ. मंजिरी भालेराव, अधिष्ठाता मंजूषा गोखले यावेळी उपस्थित होते. 54वा राष्ट्रीय संस्कृतदिन समारंभ सदाशिव पेठेतील टिमविच्या सभागृहात गुरुवारी पार पडला. याप्रसंगी माध्यमिक शालांत परीक्षेत संस्कृतमध्ये उत्कृष्ट गुण मिळविलेल्या 70 हून अधिक विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. त्याचबरोबर लघुपट स्पर्धेतील विजेत्यांचादेखील प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

पुरस्काराला उत्तर देताना डॉ. कोल्हटकर म्हणाल्या, लोकमान्यांच्या नावाने पुरस्कार मिळणे हे माझे भाग्यच आहे. लोकमान्यांचे विचार व ग्रंथ लहानपणापासून वाचायला मिळाले. लोकमान्यांना मंडालेच्या तुरुंगात कोणतीही सोयीसुविधा नसताना भगवद् गीता सोप्या भाषेत लिहिण्यात ते मग्न होते. जनतेला मानसिक गुलामीतून काढण्यासाठी लोकमान्यांनी अविरत प्रयत्न केले. त्यांचा प्रभाव जनसामान्यांवर होता. लोकमान्यांचे विचार आपण आत्मसात केले पाहिजेत, असेही यावेळी त्या म्हणाल्या. अध्यक्षीय भाषणात डॉ. दीपक टिळक म्हणाले, लोकमान्य स्वतः संस्कृत तज्ज्ञ होते. लोकमान्यांनी राष्ट्रीय शिक्षणाची संकल्पना मांडली. टिमविच्या स्थापनेवळी संस्कृत विषयाचा पहिला विभाग होता. अनेक तज्ज्ञ या विभागाने घडविले आहेत. अनेक संस्कृततज्ज्ञ, संशोधक, विद्यार्थी विभागाशी जोडले गेले आहेत. संस्कृत क्षेत्रातील तज्ज्ञ, संशोधन करणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार देऊन सन्मान केला जातो, असेही यावेळी त्यांनी नमूद केले. डॉ. अंबरीश खरे यांनी मान्यवरांची ओळख करून दिली. डॉ. प्रसाद जोशी यांनी डॉ. माधवी कोल्हटकर यांचा परिचय करून दिला. सूत्रसंचालन धनश्री शेजवलकर यांनी केले. तर प्रा. मंजूषा गोखले यांनी आभार मानले.